# डॉ.भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख
# (दि.२७ डिसेंबर,१८९८ ते दि.१० एप्रिल, १९६५)
# (अल्प परिचय)

महाराष्ट्रातील एक शिक्षणप्रेमी, तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते व भारताचे कृषिमंत्री अशी ओळख असलेल्या डॉ.पंजाबराव शामराव देशमुख यांचा जन्म अमरावती जिल्हयातील पापळ या खेडयातील शेतकरी कुटूंबात झाला. पंजाबरावांचे प्राथमिक शिक्षण पापळ मध्येच झाले. अमरावतीच्या हिंदू हायस्कूलमधून मॅट्रिक उत्तीर्ण केल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात दाखल झाले. परंतु पदवी घेण्यापूर्वीच ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. इंग्लंडमध्ये त्यांनी एम.ए. (एडिंबरो), डी.फिल् (ऑक्सफर्ड) आणि बार अट लॉ या पदव्या मिळविल्या. ऑक्सफर्ड विद्यापीठात संस्कृतचे संशोधक म्हणूनही काही दिवस काम करून ते भारतात परत आले.

अमरावतीमध्ये त्यांनी वकीली सुरू केली. पंजाबरावांनी वकीलीबरोबरच समाजकार्यास प्रारंभ केला. सार्वजनिक विहिरी हरिजनांसाठी खुल्या केल्या. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. अमरावतीचे अंबादेवी मंदिर अस्पृश्यांना खुले करण्यासाठी सत्याग्रह केला. सन १९३० च्या प्रांतिक कायदेमंडळात निवड झाली व ते शिक्षण, कृषि, सहकार आणि लोककर्म खात्याचे मंत्री झालेत. सन १९३३ मध्ये त्यांनी राजीनामा दिला. तद्‌नंतर ते अमरावती मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष झाले. बहुजन समाजाच्या विकासासाठी श्रध्दानंद छात्रालय (१९२६) व श्री.शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली (१९३२). अल्पावधीतच अनेक शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहे सुरू केली. शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत असतांनाच त्यांनी परंपरागत शेती पध्दतीत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकसभेच्या निवडणूकीमध्ये विजय संपादन करून सन १९५२ ते १९६२ या कालावधीत कृषि व सहकार मंत्री पद भूषविले. भारताच्या कृषि विषयक प्रगतीचे जगाला दर्शन घडावे म्हणून त्यांच्या प्रेरणेने दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शन भरविण्यात आले (१९६०).

डॉ. पंजाबराव देशमुख्य यांचे दिनांक १० एप्रिल, १९६५ रोजी दिल्ली येथे निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ अकोला जिल्हयात डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

----------

स्रोत सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ